पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे - १७

ड प्रभाग समिती,

कार्यपत्रिका क्र.३

**सभावृत्तांत**

दिनांक ०७/०६/२०१३ वेळ दुपारी १२.०० वाजता

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समितीची मासिक सभा शुक्रवार दि. ०७/०६/२०१३ रोजी दुपारी १२.०० वाजता ड प्रभाग कार्यालयाच्या छत्रपती शाहू महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. सदर सभेस पुढीलप्रमाणे सन्मा.सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा.सोनाली जम, | अध्यक्षा, |
| २ | मा.प्रभाकर वाघेरे | सदस्य |
| ३. | मा.प्रमोद ताम्हणकर | सदस्य |
| ४. | मा.विनोद नढे | सदस्य |
| ५. | मा.अप्पा पवार | सदस्य |
| ६. | मा.निलेश बारणे | सदस्य |
| ७. | मा.विलासराव नांदगुडे | सदस्य |
| ८. | मा.राजेंद्ग जगताप | सदस्य |
| ९. | मा.प्रशांत शितोळे | सदस्य |
| १०. | मा.निता पाडाळे | सदस्या |
| ११. | मा.अनिता तापकीर | सदस्या |
| १२. | मा.विमलताई जगताप | सदस्या |
| १३. | मा.झामाबाई बारणे | सदस्या |
| १४. | मा.स्वाती कलाटे | सदस्या |
| १५. | मा.आरती चोंधे | सदस्या |
| १६. | मा.शितल काटे | सदस्या |
| १७. | मा.शकुंतला धराडे | सदस्या |
| १८. | मा.शैलजा शितोळे | सदस्या |
| १९. | मा.सुषमा तनपुरे | सदस्या |

याशिवाय मा.पी.एच.झुरे, प्रभाग अधिकारी , मा.व्ही.एम.इंगुळकर, प्रशासन अधिकारी, सभा शाखा, मा.गुलाब दांगट, कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा.एस.एस.चव्हाण, कार्यकारी अभियंता विदयुत, मा.निकम एम.डी.कार्यकारी अभियंता, जलनिसारण विभाग, मा.सोमनाथ परदेशी, उपअभियंता, स्थापत्य, मा.डी.एस.सोनवणे, उपभियंता, स्थापत्य, मा.एस.डी.पोरेडी, उपअभियंता, स्थापत्य, मा.रामनाथ टकले,

उपअभियंता, स्थापत्य, मा.विनय ओव्हाळ, उपअभियंता, स्थापत्य, मा.एस. पारखी , उपअभियंता, स्थापत्य, मा.दिलीप धुमाळ, उपअभियंता, विदयुत, मा.पी.एस.केदारी, उपअभियंता विदयुत, मा.फारुक शेख, उपअभियंता, पाणीपुरवठा विभाग, मा.राजेंद्ग जावळे, उपअभियंता, पाणीपुरवठा विभाग, मा.व्ही.एन.देसले, उपअभियंता पाणीपुरवठा विभाग, मा.संजय कांबळे, उपअभियंता, जलनिसारण विभाग, मा.रविंद्ग पवार, उपअभियंता, जलनिसारण विभाग , मा.व्ही.के.बेंडाळे, सहा.आरोग्याधिकारी, इत्यादी अधिकारी उपस्थित होते..

सभेच्या सुरुवातीस मा.अध्यक्ष यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरुवात केली. तदंनतर मा.अध्यक्ष यांनी मागील कार्यपत्रिका क्र.२ दिनांक ३/५/२०१३ व दिनांक १०/५/२०१३ रोजीच्या सभेचा सभावृत्तांत कायम करण्यात आल्याचे प्रकट केले.

तदनंतर मा.अध्यक्ष यांचे मान्यतेने व मा.नगरसदस्य यांचे मागणीप्रमाणे पुढीलप्रमाणे ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेण्यात आले.

**विषय क्र.१** नादुरुस्त वाचनालय काढून टाकणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.प्रमोद ताम्हणकर यांचा प्रस्ताव.

**विषय क्र.२** काळेवाडी गावठाण येथे कै.रामचंद्ग काळे मार्ग व काळेवाडी गावठाणकडे असे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.निता विलास पाडाळे यांचा प्रस्ताव.

**विषय क्र.३** वॉर्ड क्र.५८ नवी सांगवी भागातील प्रचलित नगर व तेथील रहिवाश्याचे बोर्ड लावणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.शैलजा शितोळे यांचा प्रस्ताव.

**विषय क्र.४** वॉर्ड क्र.६० सांगवी गावठाण मध्ये चालु विकास कामे आहेत त्याठिकाणी विविध भागांना , विविध नगरांना नांव देणे , नागरीकांचे नांवे बोर्डावर लावणे, मनपाचे नांव, बोधचिन्ह तसेच बोर्डावर सुविचार किंवा बोधवाक्य नागरीकांशी संबंधीत हितकारक वाक्य व संकल्पना असलेल्या नगरसदस्यांचे नांव बोर्ड लावणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव.

**विषय क्र.५** सांगवी येथील मुळा नदीकडील रस्त्यावरील सार्वजनिक संडास ब्लॉक पाडून टाकणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव.

ठराव क्रमांक ७ विषय क्र.१
दिनांक ७/६/२०१३ विभाग - स्थापत्य
सुचक - मा. प्रमोद ताम्हणकर अनुमोदक - मा.विनोद नढे

संदर्भ :- मा.प्रमोद ताम्हणकर यांचा दिनांक ६/७/२०१३ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.४६ विजयनगर येथील शांती कॉलनी सी जवळील मनपाचे वाचनालयाची दुरावस्था झालेली असून ते नादुरुस्त झालेले आहे. सदर वाचनालयाचा गैरवापर होत असून ते वाचनालय काढून टाकणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला**

ठराव क्रमांक ८ विषय क्र.२
दिनांक ७/६/२०१३ विभाग - स्थापत्य
सुचक - मा.निता पाडाळे अनुमोदक - मा.आरती चोंधे

संदर्भ :- मा.निता विलास पाडाळे यांचा दिनांक ६/७/२०१३ रोजीचा प्रस्ताव

काळेवाडी गावठाण मारुती मंदिराशेजारील रोडला काळेवाडी गावठाणाकडे व कै.रामचंद्ग काळे मार्ग असे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.**

ठराव क्रमांक ९ विषय क्र.३
दिनांक ७/६/२०१३ विभाग - स्थापत्य
सुचक - मा.शैलजा शितोळे अनुमोदक - मा.सुषमा तनपुरे

संदर्भ :- मा.शैलजा शितोळे यांचा दिनांक ७/६/२०१३ रोजीचा प्रस्ताव.

नवी सांगवी वॉर्ड क्र.५८ मधील लोकवस्ती दाट आहे.सदर ठिकाणी नगर व तेथील रहिवाशी यांचे नांव बोर्ड तयार करुन ते लावणे व सौजन्य म्हणून स्थानिक नगरसदस्य यांची नावे टाकण्यात यावीत व सुविचार लिहिण्यात यावीत . अशाप्रकारचे बोर्ड लावण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.**

ठराव क्रमांक १० विषय क्र.४
दिनांक ७/६/२०१३ विभाग - स्थापत्य
सुचक - मा.प्रशांत शितोळे अनुमोदक - मा.सोनाली जम

संदर्भ :- मा.प्रशांत शितोळे यांचा दिनांक ७/६/२०१३ रोजीचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत सांगवी येथे वॉर्ड क्र.६० (सांगवी गावठाण) मध्ये चालु विकास कामे आहेत यातील पुर्वीच्या वॉर्ड क्रमांक ९१ (एस.टी.कॉलनी) वॉर्डमध्ये तत्कालीन तत्कालीन कार्यकालातील कामांमध्ये वॉर्डमधील विविध भागांना प्रचलीत प्रथेप्रमाणे विविध नगरांना नांवे देणे तसेच गल्ल्यांमधील रहिवाशी नागरीकांची नांवे बोर्डवर लावणे, पिंपरी चिंचवड मनपाचे नांव, बोधचिन्ह, तसेच वॉर्ड क्र.६० व काम चालु केल्याचे सन व या बोर्डवर सुविचार किंवा बोधवाक्य नागरीकांशी संबंधीत हितकारक वाक्य व संकल्पना असलेल्या नगरसदस्यांचे नांव या बाबीचा उल्लेख सदर बोर्डवर असावा. सबब सदरच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव कायम होणेची वाट न पहाता तातडीने अंमलबजावणी करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.**

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक ११ | विषय क्र.५ |
| दिनांक ७/६/२०१३ | विभाग - स्थापत्य |
| सुचक - मा.प्रशांत शितोळे | अनुमोदक - मा.विनोद नढे |

संदर्भ :- मा.प्रशांत शितोळे यांचा दिनांक ६/७/२०१३ रोजीचा प्रस्ताव

सांगवी येथील मुळा नदीकडील रस्त्यावरील सार्वजनिक संडास ब्लॉक पाडून टाकणेत यावे. वॉर्ड क्रमांक ५९ मधील या ब्लॉकचे आसपास १०० टक्के रहिवासी झोन असून, या ब्लॉकची आवश्यकता नाही व त्याप्रमाणे नागरीक मागणी करीत आहेत. त्यामुळे सदर ब्लॉक पाडण्यात यावे. सबब सदरच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव कायम होणेची वाट न पहाता कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

**सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.**

यानंतर मा.अध्यक्ष यांनी सभा संपल्याचे प्रकट केले.

सही/-

सोनाली पोपट जम

अध्यक्षा

ड प्रभाग समिती,पिं.चिं.म.न.पा.,

सही/-

प्रशासन अधिकारी सभा शाखा

ड प्रभाग समिती ,पिं.चिं.म.न.पा.,

रहाटणी, पुणे - १७

जा.क्र.ड/सभा/कावि/१५/२०१३

दिनांक ३/९/२०१३

प्रति,

मा.श्री./श्रीमती -----------------------

सदस्य / सदस्या ड प्रभाग समिती,